डॉ. शैलेजकुमार कंकु माने, वैद्यकीय अधिकारी,
गट-अ यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः न्यायिक-२०१८/प्र.क्र.१७१/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा मजला
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
तारीख: १७ सप्टेंबर, २०१९

वाचा:- १) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/मवैआसे/२/डॉ. मानेशैकं/ऐसेनि / ते.क्र.१/ २ब /१३ /९१५, दि. २५.०६.२०१३.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन पत्र क्र. मवैअ-१५१३/सं.क्र.७०३/सेवा-३, दि.१६.०४.२०१३.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन पत्र क्र. मवैअ-१५१३/प्र.क्र.५४५/सेवा-३, दि.३०.०५.२०१४.
४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ६९२८/२०१६ मध्ये दि.२५.०४.२०१८ रोजी दिलेले आदेश.

प्रस्तावना :-

डॉ. शैलेजकुमार कंकु माने, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, उप जिल्हा रुग्णालय, कराड, जि. सातारा यांनी दि.०१.०१.२०१३ रोजीच्या नोटीसीन्वये स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करण्याबाबत विनंती केली होती. तथापि, डॉ. माने यांची शासन निर्णय दि.२१.११.१९९५ अन्वये नामनिर्देशनाने नियुक्तीच्या दिनांकापासून ते त्यांनी दि.०१.०१.२०१३ च्या अर्जान्वये दिलेल्या स्वेच्छा सेवानिवृत्ती नोटीसीचा विहित कालावधी संपण्याच्या दिनांकास म्हणजेच दि.३१.०३.२०१३ रोजी पर्यंत त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नियम ६६ (१) अनुसार २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण होत नसल्यामुळे त्यांची दि.०१.०१.२०१३ रोजीची स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस दि.१६.०४.२०१३ रोजीच्या शासन पत्रान्वये अमान्य करण्यात आली होती. डॉ. माने यांची स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस अमान्य केल्यामुळे त्यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करुन सेवानिवृत्तीविषयक लाभ मिळण्याबाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र.१०७९/२०१५ दाखल केला होता. सदर मुळ अर्जाच्या अनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि. २०.०१.२०१६ रोजी शासनाच्या बाजूने निकाल दिला होता. त्यामुळे डॉ. माने यांनी मा. न्यायाधिकरणाच्या दि. २०.०१.२०१६ च्या आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ६९२८/२०१६ दाखल केली होती. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा.

उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २५.०४.२०१८ रोजी आदेश पारित केले असून त्यातील परिच्छेद क्र. २९ मध्ये (A), (B), (C), (D), (E) व (F) मध्ये आदेश दिलेले आहेत. त्यातील (B), (C) व (E) मधील आदेश थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :

"(B) The respondents communication dated 30th May, 2014 rejecting the petitioner's proposal to proceed on voluntary retirement with effect from 24th April 2013 is hereby set aside.

(C) We direct the respondents to treat the petitioner as voluntarily retired with effect from 24th April 2013 for all legal and practical purposes.

(E) The respondent are directed to pay to the petitioner all retiral benefits like pension etc. within three months from today on the basis that the petitioner stands voluntarily retired from service with effect from 24th April 2013. If the arrears are not cleared within three months from today, the respondents shall be liable to pay interest at the rate of 7% per annum effective from 24th April 2013 till the date of actual payment."

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाचे तातडीने अनुपालन करण्यासाठी डॉ. माने यांची अस्थायी कालावधीतील सेवा सेवानिवृत्ती विषयक लाभासाठी ग्राह्य धरुन मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दि. २५.०४.२०१८ च्या आदेशात जरी डॉ. माने यांना दि. २४.०४.२०१३ पासून स्वेच्छा सेवानिवृत्त करण्याबाबत आदेशित केलेले असले तरी डॉ. माने यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस दि. ०१.०१.२०१३ रोजी दिलेली असल्याने व त्या नोटीशीचा विहित कालावधी दि. ३१.०३.२०१३ रोजी समाप्त होत असल्याने तसेच डॉ. माने यांनी त्यांच्या दि. ३१.०३.२०१३ च्या पत्रान्वये दि. ०१.०४.२०१३ (म.पू.) पासून वैद्यकीय अधिकारी पदावर कामावर येऊ शकणार नसल्याचे कळविल्यानुसार व त्यानुसार वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय कराड यांनी त्यांच्या दि. १७.१०.२०१३ च्या पत्रान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ कोल्हापूर यांना डॉ. शैलेजकुमार माने यांची स्वेच्छासेवानिवृत्तीची नोटीसीची मुदत दि. ३१.०३.२०१३ रोजी संपल्याने ते स्वत: (डॉ. माने) दि.०१.०४.२०१३ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी कार्यमुक्त झाले असल्याचे कळविल्यानुसार डॉ. माने यांना दि. ०१.०४.२०१३ (म.पू.) पासून स्वेच्छा सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे. सबब, मा. उच्च न्यायालयाचे दि. २५.०४.२०१८ च्या आदेशानुसार डॉ. माने यांची दि.०३.०८.१९९१ रोजीपासूनची तात्पुरती प्रथम नियुक्ती विचारात घेता त्यांची दि.०१.०१.२०१३ ची स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विचारात घेऊन त्यांना दि.०१.०४.२०१३ (म.पू.)

पासून स्वेच्छा सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे. सबब, त्यांची दि. ०१.०१.२०१३ ची स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विचारात घेऊन त्यांना दि.०१.०४.२०१३ (म.पू.) पासून स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करण्याची तसेच वाचा अ.क्र. २ व ३ येथील अनुक्रमे दि.१६.०४.२०१३ व दि. ३०.०५.२०१४ रोजीची शासन पत्रे रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

उपरोक्त वाचा अनुक्रमांक २ व ३ येथील अनुक्रमे दि.१६.०४.२०१३ व दि. ३०.०५.२०१४ रोजीची शासन पत्रे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

२. वाचा अ. क्र. ४ येथे नमूद मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट याचिका क्र. ६९२८/२०१६ मधील दि.२५.०४.२०१८ च्या आदेशाचे पालन करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील (वेतन बँड रु. १५६०० - ३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४००) या मध्ये कार्यरत असलेले डॉ. शैलेजकुमार कंकु माने, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, उप जिल्हा रुग्णालय, कराड, जि. सातारा यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.२१.११.१९९५ अन्वये नामनिर्देशनाने नियुक्ती झाली आहे. तत्पुर्वी ते दि.०३.०८.१९९१ पासून अस्थायी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट याचिका क्र. ६९२८/२०१६ मधील दि. २५.०४.२०१८ चे आदेशानुसार त्यांची दि. ०३.०८.१९९१ पासूनची तात्पुरती प्रथम नियुक्ती विचारात घेऊन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याच्या अनुषंगाने डॉ. माने यांची म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्र. ६६ (१) मधील तरतुदीनुसार २० वर्षाची अर्हताकारी सेवा दि.०२.०८.२०११ रोजी पूर्ण होत असल्याचे गृहीत धरुन, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ (५) नुसार डॉ. माने यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विहित कालावधीत मागे न घेतल्याने, म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ (२) नुसार डॉ. माने हे आपोआपच स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या नोटीशीच्या समाप्तीच्या दिनांकास स्वेच्छा सेवानिवृत्त (Deemed to retire) झाले आहेत. सबब, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे वाचा अ. क्र. ४ येथील आदेशास अनुसरुन डॉ. माने यांनी दि.०१.०१.२०१३ च्या अर्जान्वये दिलेली स्वेच्छा सेवानिवृत्तीची सूचना स्विकारण्यात आली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्रमांक ६६ (१) (२) (५) मधील तरतुदी नुसार डॉ. शैलेजकुमार कंकु माने,

वैद्यकिय अधिकारी, गट-अ, हे दि. ०१.०४.२०१३ (म.पू.) पासून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाले असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

३. सदर आदेश पूर्वोदाहरण म्हणून समजण्यात येवू नये.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१४३३०३१९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

UMESH DHARMA RATHOD

Digitally signed by UMESH DHARMA RATHOD
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9d2847c085fbb527b4b95e71ae1457bfffcbb1147b4cb91423f372da97117d29, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=3667a98f6d3e5f0ed5652697d674c2eb05d852dd34f87fda6a20696c80787981, ou=PUBLIC HEALTH DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=UMESH DHARMA RATHOD
Date: 2019.09.17 17:12:31 +05'30'

(डॉ. उमेश ध. राठोड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे.
४) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, सातारा.
५) शासकीय अभियोक्ता, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना रिट याचिका क्र. ६९२८/२०१६ च्या अनुषंगाने अग्रेषित.
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
८) डॉ. शैलेजकुमार कंकु माने, वैद्यकिय अधिकारी यांना (उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे यांचे मार्फत)
९) निवडनस्ती सेवा-३.